| | |
|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर यांचे न्यायालय क्र.२,**<br>**निशाणी क्रमांक ०१ वरील आदेश.**<br>(पारीत दिनांक ०९.०६.२०२६)<br>सरकार विरुध्द इम्रान पठाण<br>CNR No.MHLA060011822026 |

१. गुन्हा घडल्याचा दिनांक - ०६/०६/२०२६

२. अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक - ०६/०६/२०२६

३. फिर्यादीचे नांव - पो.अं. चैतन चंपतराव पाकलवाड
पोलीस स्टेशन, अहमदपूर.

४. आरोपीचे नांव - इम्रान जिलानी पठाण,
वय - ३४ वर्षे, व्यवसाय -व्यापार,
रा. आनंदवाडी रोड, हडोळती,
ता. अहमदपूर, जि. लातूर.

५. गुन्हयाचा तपशील -

दिनांक ०६/०६/२०२६ रोजी १६.३० वाजताच्या सुमारास, दयानंद महाविद्यालय, हडोळती १०० मीटर परीसरामध्ये रोडवर येथे आरोपी स्वत:चे फायद्याकरीता सार्वजनिक ठिकाणी राजधानी पानशॉप मध्ये इतरांना धुम्रपान करण्यासाठी सिगारेट, बिडी, तंबाखु असे तंबाखुजन्य पदार्थ विक्री करताना मिळून आले आणि याद्वारे तुम्ही सिगारेट व अन्य तंबाखुजन्य पदार्थ नियंत्रण कायदा, २००३ च्या कलम ६ (ब) अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला.

६. <u>आरोपीचे प्रतिकथन</u>

प्रश्न - तुम्हाला पोलीस केस पेपरच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर - होय.

प्रश्न - तुम्हाला वाचून दाखविलेला आरोप तुम्हाला समजला काय ?

उत्तर - होय.

प्रश्न - तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर - मला गुन्हा कबूल आहे.

'समक्ष',

Digitally signed by MEGHA CHANDRAKANT HASGE
Date: 2026.06.09 16:41:28 +0530

( एम.सी. हासगे )
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, अहमदपूर
दिनांक ०९/०६/२०२६

------------
आरोपीची स्वाक्षरी

आरोपीस माझे समक्ष आरोपाचा तपशील त्याच्या भाषेत वाचून दाखविण्यात आला तो त्यास कबूल आहे.

समक्ष,

Digitally signed by MEGHA CHANDRAKANT HASGE
Date: 2026.06.09 16:41:38 +0530

( एम.सी. हासगे )

दिनांक ०९/०६/२०२६ न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, अहमदपूर

**<u>आदेश</u>**

(दिनांक ०९/०६/२०२६)

प्रस्तुत प्रकरणात आरोपीने स्वतः जाणीवपूर्वक गुन्हा कबूल केला आहे. आरोपीस गुन्ह्याच्या गांभीर्या बाबत व शिक्षेबाबत समजावून सांगितले. आरोपीने पुरसीस निशाणी क्र.०३ दाखल करुन कमीत कमी दंड व शिक्षा व्हावी, अशी विनंती केली. अभिलेखाच्या अवलोकनांती आरोपीस यासारख्या गुन्ह्यात शिक्षा झाल्याचे दिसून येत नाही. उपरोक्त कथनांच्या विचारांती आरोपी वरील असणारी जबाबदारी पाहता, माझ्या मते खालीलप्रमाणे आदेश करणे न्यायसंगत ठरेल :-

**<u>आदेश</u>**

०१. आरोपी इम्रान जिलानी पठाण, रा. आनंदवाडी रोड, हडोळती, ता.अहमदपूर, जि. लातूर यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये सिगारेट व अन्य तंबाखुजन्य पदार्थ नियंत्रण कायदा, २००३ च्या कलम ६ (ब) च्या गुन्ह्याकरीता दोषी धरण्यात येते व रक्कम रुपये २००/- (दोनशे रुपये) द्रव्य दंडाची शिक्षा देण्यात येत आहे. जर आरोपीने द्रव्य दंडाची रक्कम भरली नाही तर आरोपीने ०३ दिवसांची साध्या कैदेची शिक्षा भोगावी.

०२. जप्त मुद्देमाल ब्रिस्टॉल कंपनी लेबल सिगारेट ३ सिलबंद पाकीटे तंबाखु गायछाप ०४ पुडया, सुर्याछाप तोटा ८० पुडया व खुले नग एकुण किंमत ५००/- ची कायद्यात नमुद तरतुदीप्रमाणे विल्हेवाट लावावी.

(आदेश खुले न्यायालयात जाहीर).

Digitally signed by MEGHA CHANDRAKANT HASGE
Date: 2026.06.09 16:41:49 +0530

( एम.सी. हासगे )

दिनांक - ०९/०६/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.२), अहमदपूर